डॉ. प्रभाकर देसाई
एम्.ए., पीएच् डी.
संचालक

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

कार्यालय क्र. : ०२०–२५६९७३४१
०२०–२५६०११५३
फॅक्स क्र. : ०२०–२५६९७३४१
मोबाईल : ९८८१९०८०२०

संदर्भ : रासेयो/२०१९–२०/४८७ दि. १५/०१/२०२०

प्रति,

मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख,

संबधित महाविद्यालये/विभाग/परिसंस्था

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा.

विषय : १६ व्या राज्यस्तरीय गांधी विचार अभ्यास शिबिरासाठी विद्यार्थी पाठविणेबाबत

महोदय,

महात्मा गांधी अध्ययन केंद्र, विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली पुरस्कृत यांच्या मार्फत उपरोक्त विषयांन्वये आलेल्या पत्रानुसार महात्मा गांधींच्या विचारांचा प्रचार–प्रसार युवकांमध्ये व्हावा आणि त्यांचे प्रबोधन करण्याचा प्रयत्न या शिबीरामधुन होतो. या उदेशाने दि. २९ जानेवारी ते ०२ फेब्रुवारी २०२० दरम्यान १६ व्या राज्यस्तरीय गांधी विचार अभ्यास शिबिराचे आयोजन केले आहे. या शिबिराचा विषय “१५० नंतर गांधी” हा आहे. या शिबिरात तज्ञाचे मार्गदर्शन व चर्चा होणार आहे.

सदर शिबीराची संपूर्ण माहिती महाविद्यालयामार्फत संबधीत विद्यार्थ्यांच्या पालकांना कळविण्यात यावी. तसेच सोबत जोडलेल्या हमीपत्रावर पालकांची, महाविद्यालयातील मा. प्राचार्य व कार्यक्रम अधिकारी यांची स्वाक्षरी घेवून सर्व कागदपत्रे स्वयंसेवकासोबत शिबीरामध्ये सहभागी होताना पाठविण्यात यावी व विद्यार्थ्यांचा प्रवासखर्च नियमित कार्यक्रमातून करण्यात यावा. विद्यार्थ्यांची नाव नोंदणी दि. २४ जानेवारी २०२० पर्यंत पुढील लिंकवर https://forms.gle/nX1VJM6Jf2yQjoJN6 अथवा vasnt.ugale@gmail.com या मेलवर करावी. कळावे, ही विनंती.

संचालक
राष्ट्रीय सेवा योजना

सोबत : सविस्तर पत्र आपल्या माहिती व कार्यवाहीसाठी जोडले आहे.

अधिक माहितीकरिता संपर्क : १. डॉ. यशवंत सोनुने– ९४२२७२५३३०
२. डॉ. महावीर सदावर्ते– ९८२३७३९७५९
३. डॉ. व्ही.बी. ऊगले– ९७६४२०८२७९

**जे.ई.एस.महाविद्यालय,जालना**
**विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली पुरस्कृत**
**महात्मा गांधी अध्ययन केंद्र,**
**१६ वे राज्यस्तरीय गांधी विचार अभ्यास शिबीर**

**१५० नंतर गांधी**

**दिनांक २९ जानेवारी ते ०२ फेब्रुवारी २०२०**

मित्रहो, सस्नेह नमस्कार !

आमच्या महाविद्यालयात मागील तेरा वर्षापासून विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सहकार्याने महात्मा गांधी अध्ययन केंद्र सुरु आहे. युवकांमध्ये महात्मा गांधीच्या विचारांचा प्रचार-प्रसार व्हावा नि त्यांना रचनात्मक कार्याकडे वळवावे या उद्देशाने मागील पंधरा वर्षापासून महाविद्यालयीन युवक-युवतीसाठी राज्यस्तरीय गांधी विचार अभ्यास वर्गाचे आयोजन आम्ही करीत असतो.

यावर्षी दिनांक २९ जानेवारी ते ०२ फेब्रुवारी २०२० दरम्यान '१५० नंतर गांधी' या विषयावर १६ व्या राज्यस्तरीय अभ्यास शिबीराचे आम्ही आयोजन करीत आहोत.

दरवर्षी नवनवीन विषयांवर या शिबिराचे आयोजन केले जाते. आत्तापर्यंत रचनात्मक कार्य, ग्रामीण विकास, सत्याग्रही आंदोलने, विकासाचे खरे पर्याय, महात्मा गांधींचा मूल्य विचार, स्त्री-पुरुष सहजीवन, सामाजिक न्याय, गांधी विचारांसमोरील आव्हाने, गांधी आणि युवा, गांधी समजून घेताना आणि आजच्या संदर्भात गांधी व युवा आदि संकल्पना घेऊन शिबिरे झाली आहेत.

या शिबिरामध्ये लवनमजी, पोपटराव पवार, मेधा पाटकर, डॉ.यशवंत सुमंत, अर्जुन डांगळे, कुमार प्रशांत, डॉ.उल्हास जाजू, सुनीती सु.र., विजयअण्णा बोराडे, डॉ.पारस बोरा, प्रा. संजय मंगला गोपाल, डॉ. सोमनाथ रोडे, मुकंद दिक्षित, रमेश दाणे, डॉ.मु.ब.शहा, डॉ. सोहम पांडया, प्रतिभाताई शिंदे, डॉ. सुधीर गव्हाणे, ॲड. असिम सरोदे, अमरनाथभाई, डॉ.सच्चिदानंद, पर्यावरण तज्ज्ञ डॉ.विश्वंभर चौधरी (पुणे), डॉ.विश्वजीत रॉय(उडिसा), ॲड. राज कुलकर्णी, विवेकानंद माथने आदी अनेक मान्यवरांनी मार्गदर्शन केले आहे.

या निमित्तानं महाराष्ट्रातील वेगवेगळ्या भागातून आलेल्या युवक-युवतींच्या विचारांचे आदान-प्रदान होत असते. भारत भरातील अभ्यासक, वक्ते यांचे विचार ऐकायला मिळणार आहेत.

या शिबिरात जेष्ठ पत्रकार मा.संजय आवटे, पर्यावरण तज्ज्ञ मा.सोपान जोशी (दिल्ली), उल्का महाजन (रायगड), उत्पल व.बा.(पुणे),दिप्ती राऊत (नाशिक),राजा शिरगुप्पे (अजरा), राही श्रुती गणेश (पुणे), हलीमा कुरेशी(पुणे), मिनाज लाटकार (औरंगाबाद), ज्ञानप्रकाश मोदानी (औरंगाबाद), मनोज ठाकरे (सेवाग्राम), प्रशांत नागोसे (वर्धा) आदी मान्यवरांना निमंत्रित करण्यात आले आहे.

तेंव्हा उशीर कशाला आपली नोंदणी दिनांक २४ जानेवारी २०२० पर्यंत मोबाईल/व्हाट्सअप अथवा ई-मेल द्वारे करावी. म्हणजे पुढील सुविधेसाठी वेळ मिळेल. कृपया याची नोंद घ्यावी.

---

*** शिबिराचा तपशील ***

**शिबिराचा कालावधी** :२९ जानेवारी ते ०२ फेब्रुवारी २०२० * **शिबिर स्थळ** : जे.ई.एस.महाविद्यालय,जालना
**नावनोंदणी**: दि.२४ जानेवारी २०२० पर्यंत https://forms.gle/nX1VJM6Jf2yQjoJN6 या लिंक करावी.
• **शिबिराचा प्रारंभ** : २९ जानेवारी, २०२० सकाळी ५.०० वाजता.
**शिबिराचा समारोप** : ०२ फेब्रुवारी २०२०, दुपारी ३.०० नंतर

**अन्य सूचना.**

१. शिबिरार्थीनी दिनांक २८ जानेवारी, २०२० रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत शिबिर स्थळी पोहोचावे. उशीर होणार असेल तर तसे कळवावे.
२. शिबिर पूर्ण निवासी असल्याने व दिवसभर भरगच्च कार्यक्रम असल्याने या काळात नातेवाईकांकडे व अन्य परिचितांकडे जाण्याची अथवा अन्य कारणासाठी बाहेर जाण्यासाठी मोकळा वेळ असणार नाही. तशी परवानगी मागू नये, तसेच शिबीर काळात कोणास भेटण्यास सुध्दा बोलावू नये.
३. शिबिर काळात थंडीचे दिवस असल्यामुळे शिबिरार्थीनी पुरेसे गरम कपडे व पांघरूण सोबत आणावेत, योगासाठी आसनपट्टी आणावी.
४. सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यासाठी आवश्यक ते साहित्य सोबत आणावे.
५.भोजन व निवासाची सर्वसाधारण (शिबिरासाठीची) सोय संयोजकांच्या वतीने केली जाईल.
६. शिबिराचा समारोप झाल्याशिवाय कुणालाही सहभाग प्रमाणपत्र मिळणार नाहीत.
७.बौद्धिक सत्रात मोबाइल वापरता येणार नाही.

**संपर्क** :-डॉ.यशवंत सोनुने- मो:९४२२७२५३३०, yashsonune@gmail.com, डॉ.महावीर सदावर्ते- मो:९८२३७३९७५९, डॉ.व्ही.बी.ऊगले -९७६४२०८२७९

**जे.ई.एस.महाविद्यालय,जालना**
**विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली पुरस्कृत**
**महात्मा गांधी अध्ययन केंद्र,**

## १६ वे राज्यस्तरीय गांधी विचार अभ्यास शिबीर

**१५० नंतर गांधी**

**दिनांक २९ जानेवारी ते ०२ फेब्रुवारी २०२०**

| *** शिबिराचे वेळापत्रक *** | *** कार्यक्रम *** |
|---|---|
| स.०५.०० ते ०५.०५. | जागरण व रॅली पोष्ट |
| ०५.०५.ते ०५.४५ | प्रातःविधी |
| ६.०० ते ६.१५ | प्रार्थना |
| ६.१५ ते ७.०० | योग |
| ७.०० ते ७.३० | सुबह का सच |
| ७.३० ते ८.४५ | श्रमसंस्कार |
| ८.४५ ते १०.३० | आंघोळ आणि न्याहरी |
| १०.३० ते १०.४५ | गीत वर्ग |
| १०.४५ ते १२.३० | **व्याख्यान व गटचर्चा** |
| १२.३० ते १.३० | भोजन |
| १.३० ते २.३० | विश्रांती |
| २.३० ते २.४५ | गीत वर्ग |
| २.४५ ते ४.३० | **व्याख्यान व गटचर्चा** |
| ४.३० ते ५.३० | खेळ |
| ५.३० ते ६.०० | मुक्तवेळ |
| ६.०० ते ७.०० | चावडी |
| ७.०० ते ८.०० | भोजन |
| ८.०० ते ८.४५ | मूल्यांकन |
| ८.४५ ते ९.४५ | सांस्कृतिक कार्यक्रम |
| ९.४५ ते १०.०० | सर्वधर्म प्रार्थना |
| १०.०० | झोप |